दै. लोकमत दि. 01/02/25

# तस्करांचा हल्ला

## वन अधिकाऱ्याचे डोके फुटले

### भल्या पहाटे दोनशे जवानांना घेऊन चिखलीत छापेमारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**किनवट :** लाकूड तस्करीसाठी कुप्रसिद्ध असलेल्या किनवट तालुक्यातील चिखली(बु) गावांत वनविभाग, पोलिस व आरटीओ या विभागाच्या दोनशेहून अधिक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी ३१ जानेवारी रोजी पहाटे चार वाजता संयुक्तपणे धाड टाकली. यावेळी साडेचार लाख रुपयांचे अवैध सागवान जप्त केले आहे. छापामारी सुरू असतानाच सागवान तस्करांनी गावातील लाईट बंद केली. त्यानंतर कर्मचाऱ्यांच्या ताफ्यावर दगडफेक सुरू केली. यात पोलिस जीपच्या काचा फुटल्या असून एक अधिकारी जखमी झाला आहे. याप्रकरणी २० जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

किनवट ते नांदेड या मार्गावर किनवटपासून १२ किलोमीटर अंतरावर असलेल्या चिखली(बु) या गावात मौल्यवान सागवान लाकडाची अवैध कत्तल करून त्याची साठवणूक ठेवल्याची माहिती वनविभागाला मिळाली. त्यानुसार ३१ जानेवारी रोजी पहाटे चार वाजता सर्वजण पोलिस ठाण्यात जमले. तिथून संयुक्तपणे हे पथक जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, उपवनसंरक्षक केशव वाबळे, बी. एम. स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली भोकरचे अपर पोलिस अधीक्षक डॉ. खंडेराय धरणे, किनवटचे उपविभागीय पोलिस अधिकारी रामकृष्ण मळघणे, सहाय्यक परिवहन अधिकारी संदीप निमसे, किनवटचे सहा. वनसंरक्षक गणेश गिरी यांच्या उपस्थितीत ऑपरेशन चिखली करण्यात आले. धाडसत्र सुरू होताच गावातील लाईट अचानक बंद करण्यात आली. त्यानंतर अंधारात दगडफेक सुरू झाली. त्यामुळे ऑपरेशन मोहीम राबविणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची भंबेरी उडाली. यात सिंदखेड पोलिस जीपच्या काचा फुटल्या असून माहूरचे वनक्षेत्रपाल रोहित जाधव यांच्या डोक्यात दगड फेकल्याने ते जखमी झाले आहेत.ही कार्यवाही किनवटचे वनक्षेत्रपाल प्रमोद राठोड, अप्पारावपेठ उमेश ढगे, माहूरचे रोहित जाधव, इस्लापूरचे सचिन धनगे, स्ट्राईफ फोर्स इस्लापूरचे अमोल काशीकर, किनवटचे पोलिस निरीक्षक सुनील बिर्ला यांच्यासह दंगल नियंत्रण पथकाच्या दोन तुकड्या,१०० पोलिस,१२० वन कर्मचाऱ्यांनी बजावली आहे. चिखली (बु) गावाला शुक्रवारी सकाळी छावणीचे रूप आले होते. या कार्यवाहीने लाकूड तस्करांचे धाबे दणाणले आहे.

### ऑपरेशन चिखली

"ऑपरेशन चिखली"मोहिमेत २०० घनफूट कटसाईज व इमारत गोल माल असा ४ लक्ष ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चिखली बु. हे गाव सागवान तस्करीसाठी कुप्रसिध्द आहे. यापूर्वीही कारवाईसाठी गेलेल्या पथकांवर तस्करांनी हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहेत.



